# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि.

**दिनांकः26.08.2026** **वारःबुधवार**

1. पुणे जिल्ह्यात राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त येत्या 27 ऑगस्टला होणाऱ्या कार्यक्रमात पंतप्रधान विद्यार्थ्यांशी दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधणार.
2. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्याला राष्ट्रीय पुरस्कार प्रदान.
3. शेतकऱ्यांना 12 तास वीज मोफत देण्याचा राज्य सरकारचा निर्णय. आणि,
4. भारत आणि श्रीलंका यांच्यातील दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात श्रीलंकेच्या पहिल्या डावात 8 गडी बाद 265 धावा.

**क्रीडा दिन-पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त येत्या 27 ऑगस्टला पुणे जिल्ह्यात होणाऱ्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून संवाद साधणार आहेत. माय भारत आणि राष्ट्रीय सेवा योजना यांनी आयोजित केलेला हा कार्यक्रम अजिंक्य डी. वाय. पाटील युनिव्हर्सिटी, टी. जे. कॉलेज, सिंबायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी आणि विश्वकर्मा युनिव्हर्सिटी या चार ठिकाणी होणार आहे. यामध्ये विद्यार्थी, एनएसएस स्वयंसेवक, 'माय भारत'चे युवा स्वयंसेवक आणि राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू सहभागी होतील.

क्रीडा, शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त, आरोग्यदायी जीवनशैली आणि राष्ट्र-निर्माणातील युवकांची भूमिका याबाबत पंतप्रधान या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील.

**राष्ट्रीय पुरस्कार**

शेतमालाचं मूल्यवर्धन, रोजगारनिर्मिती आणि महिला उद्योजकतेला चालना देणाऱ्या प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेची प्रभावी अंमलबजावणी करत राज्यानं देशातल्या मोठ्या राज्यांच्या श्रेणीत अव्वल कामगिरी केली आहे. या उल्लेखनीय कामगिरीची राष्ट्रीय स्तरावर दखल घेत महाराष्ट्राला 'सर्वोत्तम कामगिरी करणारे राज्य' या राष्ट्रीय पुरस्कारानं गौरवण्यात आलं. केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री चिराग पासवान यांच्या हस्ते राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. नवी दिल्लीत 'प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग' योजनेबाबतच्या राष्ट्रीय परिषदेच्या समारोप सोहळ्यात हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकरी, महिला बचत गट आणि नवउद्योजकांना अन्न प्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी प्रोत्साहन मिळत असून, स्थानिक पातळीवर रोजगार आणि उद्योगनिर्मितीला चालना मिळत आहे.

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेमुळे राज्यातील सूक्ष्म अन्न प्रक्रिया क्षेत्राला मोठी आर्थिक गती मिळाली आहे. या योजनेच्या जिल्हास्तरीय प्रभावी अंमलबजावणीसाठी छत्रपती संभाजीनगर आणि अहिल्यानगरच्या जिल्हा नोडल अधिकाऱ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसंच छत्रपती संभाजीनगरचे पवन काबरा यांनी देशभरात सर्वाधिक प्रकल्प मंजूर होण्यासाठी दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांचाही विशेष पुरस्कारानं गौरव करण्यात आला.

**थकीत वीजबिलं**

राज्यातल्या शेतकऱ्यांना वर्षभर दररोज 12 तास मोफत वीज देण्याचा आणि शेतकऱ्यांची 58 हजार कोटी रुपयांची थकीत वीजबिलं माफ करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. अहिल्यानगर इथल्या एका कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते.

आतापर्यंत 12 लाख 50 हजार शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये कर्जमाफीची रक्कम जमा करण्यात आली आहे आणि एकूण 56 लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना पुढेही सुरू राहणार असून, सरकारच्या तिजोरीवर पहिला अधिकार बळीराजाचा असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या कार्यक्रमात सांगितलं.

**<u>साखर प्रक्रिया</u>**

शुल्क मुक्त तत्वावर आयात केलेल्या कच्च्या साखरेवर प्रक्रिया करून तिची विक्री करण्याच्या कालावधीत केंद्र सरकारनं बदल केला आहे. यानुसार आता आयातदारांना 'बिल ऑफ एंट्री' दाखल केल्याच्या तारखेपासून जास्तीत जास्त दोन महिन्यांच्या आत कच्च्या साखरेचं शुद्ध साखरेत रूपांतर करून ती देशांतर्गत बाजारात विक्रीसाठी उपलब्ध करावी लागेल. आगामी सणासुदीच्या काळात देशांतर्गत बाजारात साखरेची उपलब्धता वाढावी आणि किमतींवरचा ताण कमी करता यावा यासाठीच्या प्रयत्नांचा भाग म्हणून सरकारनं हा निर्णय घेतला आहे.

परकीय व्यापार महासंचालनालयानं ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीला टॅरिफरेट कोटा योजनेअंतर्गत 10 लाख टन कच्च्या साखरेच्या आयतीला परवानगी दिली होती.

**<u>राष्ट्रपती-ईद</u>**

ईद-ए-मिलाद-उन-नबी आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ईद-ए-मिलाद-उन-नबी निमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. प्रेषित मोहम्मद यांच्या शिकवणीचं स्मरण करण्याचा हा दिवस असल्याचं त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. प्रेषित मोहम्मद यांचे उदात्त विचार नागरिकांना सदाचरण आणि कर्तव्यनिष्ठेच्या मार्गावर चालण्याची, तसंच सर्वसमावेशक आणि विकसित देशाच्या निर्मितीसाठी सक्रियपणे योगदान देण्याची प्रेरणा देतात, असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<u>आदिवासी शाळा</u>**

आदिवासी विद्यार्थ्यांमधल्या रक्तक्षयाच्या समस्येचं प्रभावीपणे निर्मूलन करण्यासाठी आदिवासी विकास विभागामार्फत राज्यात रक्तक्षय निवारण कार्यक्रम राबवण्यात येत आहे. यामधे गेल्या दीड महिन्यात राज्यातल्या 203 शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळा तसंच एकलव्य मॉडेल निवासी शाळांमधल्या 79 हजार 624 विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी पूर्ण करण्यात आली. तपासणीदरम्यान ज्या विद्यार्थ्यांमध्ये हिमोग्लोबिनचं प्रमाण कमी आढळून आलं आहे, त्यांना आवश्यकतेनुसार पूरक आहार उपलब्ध करून देण्याच्या सूचना आदिवासी विकास विभागानं दिल्या आहेत. विद्यार्थ्यांचं आरोग्य सुदृढ राखण्यासोबतच त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठीदेखील हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरेल.

**<u>विखे पाटील</u>**

राज्य शासनाच्या सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्याकडील मराठा समाजाच्या संबंधी प्रलंबित विषयांवर तातडीनं कार्यवाही करण्याचे निर्देश मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहेत. मराठा समाजाशी संबंधित प्रश्नांबाबत काल झालेल्या बैठकीत ते बोलत होते. राज्य शासन मराठा समाजाच्या मागण्यांबाबत सकारात्मक असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. राज्य शासनानं ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांप्रमाणं शैक्षणिक सोयीसुविधा आणि सवलती मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी चालू शैक्षणिक वर्षापासून लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. संबंधित विभागांनी ही प्रक्रिया अधिक गतिमान करुन तातडीनं क्षेत्रिय कार्यालयांना योग्य निर्देश द्यावेत अशी सूचना विखे पाटील यांनी केली. कुणबी जात प्रमाणपत्र आणि जात पडताळणी प्रमाणपत्र वितरणाच्या कामकाजाचा आढावा घेऊन ही प्रमाणपत्रं विहीत मुदतीत देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

**<u>औषध निरीक्षक</u>**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीनं घेण्यात येणारी अन्न आणि औषध प्रशासन विभागातील औषध निरीक्षक गट 'ब' या संवर्गासाठी झालेली भरती प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय आयोगानं घेतला आहे. या प्रकरणी 22 मार्च रोजी झालेल्या परिक्षेत गैरप्रकार झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

**पालघर मृत्यू**

पालघर जिल्ह्यातल्या मासवण इथल्या अनुदानित आश्रमशाळेत सात वर्षीय विद्यार्थ्याचा ताप आल्यामुळे मृत्यू झाल्याची माहिती समोर आली असून, शाळेतील 30 विद्यार्थ्यांवर उपचार सुरू आहेत. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या सूचना प्रशासनानं दिल्या असून, या घटनेची सखोल चौकशी करण्यासाठी विशेष समितीची नियुक्ती केली आहे.

दरम्यान, अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या पालघर शाखेच्या अधिकाऱ्यांनी शाळेला भेट दिली. विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात येणाऱ्या जेवणासाठी वापरले जाणारे मसाले, हळद, मिरची आणि तेलाचे नमुने ताब्यात घेण्यात आले असून, ते पुढील तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.

**रुग्णालय ऑडिट**

राज्यातील सर्व शासकीय, खासगी आणि धर्मदाय रुग्णालयांचे फायर ऑडिट, विद्युत सुरक्षा आणि इमारत सुरक्षेचं ऑडिट तातडीनं पूर्ण करून अहवाल सादर करण्याच्या सूचना आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिल्या आहेत. रुग्णांच्या जीविताची सुरक्षा ही शासनाची सर्वोच्च जबाबदारी असून यामध्ये कोणतीही हलगर्जी सहन केली जाणार नसल्याचा इशारा त्यांनी दिला.

विशेषतः आयसीयू, एनआयसीयू, नर्सरी आणि ऑपरेशन थिएटर यांसारख्या संवेदनशील विभागांची कसून तपासणी केली जाणार आहे. दर सहा महिन्यांनी प्रत्येक इमारतीचे प्रत्यक्ष ऑडिट करणे आणि प्रत्येक संस्थेत नोडल अधिकारी नियुक्त करणे बंधनकारक केलं आहे.

**शपथ**

निवृत्त न्यायमूर्ती सुनील बाळकृष्ण शुक्रे यांना काल राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी राज्याच्या लोकायुक्त संस्थेचे अध्यक्ष म्हणून शपथ दिली. मुंबईतील लोकभवनात झालेल्या या शपथविधी सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

**क्रिकेट**

भारत आणि श्रीलंका यांच्यातील दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात काल तिसऱ्या दिवशी श्रीलंकेनं आपल्या पहिल्या डावात 8 गडी बाद 265 धावा केल्या. भारताच्या प्रसिध कृष्णा आणि मानव सुथार यांनी श्रीलंकेचे प्रत्येकी तीन फलंदाज बाद केले. पावसामुळे कालचा खेळ लवकर थांबवावा लागला.

दरम्यान, काल सकाळी भारतानं आपला पहिला डाव 503 धावांवर घोषित केला. पहिल्या डावात भारतानं 238 धावांची आघाडी घेतली आहे.

**हवामान**

राज्यात येत्या 24 तासांत कोकणांत बहुतांश ठिकाणी तर मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडेल. मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**याबरोबरच आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**